ISSN

19-20 Patil

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION


Impact Factor – 6.625

E-ISSN – 2348-7143


INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL


October-November-December 2019

Vol. 6 Issue 4 (B)


Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)


RESEARCH JOURNEY


This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

| | | | |
|---|---|---|---|
| 32 | वीरशैव संतकवी लक्ष्मण महाराजांची हिंदी रचना | डॉ.प्रवीण कारंजकर | 159 |
| 33 | नागपूर जिल्ह्यातील सांस्कृतिक क्षेत्रातील संतांचे कार्य | डॉ. प्रकाश शेन्डे | 163 |
| 34 | मराठी सामाजिक कादंबरी संकल्पनात्मक स्वरूप | श्री.गिरीधर काचोळे | 167 |
| 35 | मराठी साहित्यातील : आंबेडकरवाद | डॉ. गोविंद रावळेकर | 174 |
| 36 | दलित आत्मकथने : भाषिक वैशिष्ट्ये | डॉ. प्रकाश जाधव | 179 |
| 37 | उत्तम कांबळे यांचे कथा वाङ्मय | प्रा. माधव सूर्यवंशी | 186 |
| 38 | ग्रामीण साहित्य आणि सामाजिक चळवळ : एक दृष्टिक्षेप | डॉ. विनोद भालेराव | 189 |
| 39 | गावातील ढासळत चाललेल्या गावपणाचा शोध घेणारे गाव | डॉ.गजानन मुंधे | 192 |
| 40 | रामराव झुंजारे यांच्या 'जलमवेडी' कादंबरीचे वाङ्मयीन मूल्यमापन | प्रा.लालबा दुमटकर | 197 |
| 41 | १९९० नंतरची संस्कारशील बालकादंबरी | संतोषकुमार राठोड | 201 |
| 42 | अहिल्याबाईच्या कार्यकर्तृत्वाचा वेध घेणारी कादंबरी 'कर्मयोगिनी' | डॉ. रेखा वडिखाये | 205 |
| 43 | 'वर आभाळ खाली धरती' : एक आकलन | डॉ. गायत्री गाडेकर | 209 |
| 44 | अशोक कोतवाल यांचे ललितगद्य : स्वरूप आणि वैशिष्ट्ये | प्रा.मंजुळा साळवे | 214 |
| 45 | वाचन-संस्कृती आणि ग्रंथालयाची भूमिका | डॉ.जे.एफ.पाटील | 218 |
| 46 | महात्मा फुलेंच सामाजिक न्याय आणि सामाजिक सुधारणेतील योगदान | डॉ. वसंत खरात | 222 |
| 47 | राजर्षी शाहू महाराज यांचे शिक्षण आणि अस्पृश्यता निवारण्याचे कार्य | डॉ. लता आंदे | 227 |
| 48 | गोपाळ गणेश आगरकरांचे सामाजिक तत्त्वज्ञान | श्री. सुरेश दांडगे | 232 |
| 49 | लाला लजपतराय यांचे सामाजकार्यातील योगदान | डॉ. राजेंद्र रासकर | 238 |
| 50 | महात्मा गांधीजींचे राष्ट्रावादविषयक विचार | डॉ. विक्रमराव पाटील | 243 |
| 51 | महात्मा गांधी : अहिंसा व समकालीन हिंसेचे वास्तव | डॉ. एकनाथ खरात | 246 |
| 52 | महात्मा गांधीचे सामाजिक व स्त्री-सुधारणा धोरण | अनिल वासनिक | 256 |
| 53 | महात्मा गांधीजींची ग्राम स्वराज्याची संकल्पना | डॉ. विजया राऊत | 259 |
| 54 | स्त्री साहित्यातून स्त्री मनाचा वेध | प्रा. वंदना नेमाडे | 262 |
| 55 | स्त्रीभ्रूणहत्या : स्त्रीवादी दृष्टीकोन | डॉ. अश्विनी खापरे | 266 |
| 56 | स्त्री लेखिकांचे अनुवादित मराठी साहित्य | प्रा. तुकाराम भवर | 271 |
| 57 | पेशवेकालीन स्त्री जीवन | डॉ.लता आंदे | 277 |
| 58 | मानवी हक्क : महिला व बालके | डॉ. धनराज चौखुंडे | 281 |
| 59 | खान्देशातील कुंभार समाजाच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचे अध्ययन | सचिन कुंभार | 287 |
| 60 | इतिहासाच्या अभ्यासात वस्तुसंग्रहालयाचे महत्त्व | डॉ. निवासराव वरेकर | 292 |
| 61 | चिमूर तालुक्यातील असंघटीत कामगारांच्या आर्थिक समस्यांचे अध्ययन | डॉ. हरेश गजभिये | 296 |
| 62 | विदर्भातील शेतकरी चळवळीच्या नेतृत्त्वाचा अभ्यास : एक सामीक्षात्मक अध्ययन | प्रा.राजू लिपटे | 300 |
| 63 | बँकांच्या राष्ट्रीयकरणाची ५० वर्षे | डॉ.ए.डी.गोस्वामी | 303 |
| 64 | पूर्व-पश्चिम विदर्भातील शेतीप्रश्नांच्या राजकीयकरणाचा राज्यशास्त्रीय अभ्यास | प्रा.राजू लिपटे | 307 |
| 65 | जिल्हा नियोजन समितीच्या वार्षिक योजनांचा अभ्यास | प्रा. दिपक चौधरी | 311 |
| 66 | अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय प्रक्रिया :राजकीय पक्षांची वाटचाल (१९९०ते २०१९)-एक अभ्यास | श्री जिजाभाऊ घुले आणि डॉ.संजय गायकवाड | 317 |

'RESEARCH JOURNEY' *International E- Research Journal*
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Vol. 6, Issue 4 (B)
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-Dec. 2019

# महात्मा गांधीजींचे राष्ट्रवादाविषयक विचार

डॉ. विक्रमराव नारायणराव पाटील
शिवाजी विद्यापीठ संलग्न
शंकरराव जगताप आर्टस अॅण्ड
कॉमर्स कॉलेज, वाघोली.

**प्रास्ताविक–**

राष्ट्र ही संकल्पना प्राचीन किंवा मध्ययुगीन नसून ती आधुनिक आहे. जागतिक औद्योगिक क्रांतीनंतर युरोप खंडात तिचा उदय झाला. पाश्चमात्य राष्ट्रांच्या गरजामधून ती विकसित झालेली आहे. राष्ट्रवादाचा अभ्यास करताना काही गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे. यामध्ये राष्ट्रवादाचे सिद्धांत आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळवण्याची इच्छा आणि त्यासाठी उभी केलेली चळवळ या भिन्न गोष्टी आहेत. भारतामध्ये स्वातंत्र्य लढयाची सुरूवात १७६३ मधील फकिरांच्या उठावापासून झालेली होती. तद्नंतर वहाबींचा लढा, शेतकरी आदिवासींचे उठाव आणि १८५७ चे स्वातंत्र्य युद्ध, १८८५ मधील राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेपासून सुरू झालेल्या घटनात्मक स्वातंत्र्याच्या मागण्या, होमरूल चळवळ, सशस्त्र क्रांतीकारकांचे उठाव हे सर्व स्वातंत्र्याचे लढे होते. महात्मा गांधी प्रणीत सत्याग्रहाचा लढा, संविनय कायदेभंगाची चळवळ, १९४२ ची चलेजाव चळवळ हे स्वातंत्र्य लढयाचे वेगवेगळे अविष्यकार होते.

वसाहतवादी विचारवंतानी भारत हे एक राष्ट्र नाही. भारत देश केवळ भौगोलिक अस्तित्व आहे. ब्रिटीशांच्या प्रशासनामुळे तो जोडला आहे. असा विचार मांडला त्यावर गांधीजी म्हणतात 'तुम्ही म्हणजे (भारतीय) एक राष्ट्र नाहीत हे इंग्रजांनी शिकविले आहे. इंग्रज जेव्हा हिंदुस्थानात नव्हते. त्यावेळी ही आपण एक राष्ट्र होतो. आपले विचार एक होते, आपली राहणी एक होती म्हणून तर त्यांनी येथे एक राज्य स्थापन केले. भेद नंतर त्यांनीच आमच्यात निर्माण केले'[1] असा विचार गांधीजीनी मांडला. गांधीजींच्या मते भारताच्या शेकडो भाषा, अनेक धर्म, अनेक वंश आणि वेगळी प्रादेशिक संस्कृती असली तर ब्रिटीश येण्याआगोदर पासूनच भारत एक राष्ट्र आहे. येथील जनता परस्पर सहकार्याने राहत आहे. भारताची कृषीप्रधान संस्कृती त्याच्याशी जोडली आहे. भिन्न धर्म, भाषा, वंश संस्कृती असलेल्या आणि बाहेरून आलेल्या जमाती यांचा मिळून भारतीय समाज बनलेला आहे. यालाच ते प्रजा असा शब्द वापरतात.

हिंदू–मुस्लीम संघर्षाच्या प्रश्नावर गांधीजी म्हणतात की 'इतिहासातील घटनांमधून हिंदू मुसलमानांचे एकेकाळी शत्रुत्व असल्याने दिसून येते. हे शत्रुत्व कायमचे राहिले असे काही नाही आणि राहिलेले नाही. इतिहासात शैव व वैष्णवात, जैन आणि वैदिक धर्मीयात संघर्ष झालेले आहेत. परंतु हे संघर्ष आज फारसे राहिलेले नाहीत. हे संघर्ष जसे काळाच्या ओघात बोथट होत गेले, तसे हिंदू मुसलमानांचे झालेले आहे. गांधी पुढे म्हणतात की दोघांनाही समजून आलेले आहे की लढाई करण्यात कोणाचाही फायदा नाही म्हणून दोघे एक होऊन राहत आहेत'[2] वरील विवेचनावरून असे लक्षात येते की हिंदू मुस्लीमांमध्ये संघर्ष पेटवण्याचे काम ब्रिटीशांनी केले. त्यांनी फोडा व झोडा अशी राजनीती केली. तत्कालीन कालखंडात 'ब्रिटीश वसाहतवादाने धर्माचे 'मोनोलिथ' करण्यास सुरूवात केलेली होती. ज्या काळात म.गांधीनी हिंद–स्वराज्य लिहिले त्या काळात एका देशातील विविध धर्माचे लोक सहकार्याने रहात होते. धर्माला पुढे करून साम्राज्यवादी शक्तींची लोकसमुदायात आणि देशात कायमची फूट पाडण्याच्या तंत्राची जागतिक पातळीवर देखील पहिल्या

महायुद्धानंतर, तुर्कस्थानच्या विघटनापासून आणि इजिप्तपासून ते इराणपर्यंतच्या देशाच्या भौगोलिक सीमा रेषाची तोडफोडी करून जी नवीन राज्य साम्राज्यवादी शक्तीनी स्थापन केली तेथून या प्रक्रियेची शिस्तबद्ध योजना सुरू झाली"[3] राष्ट्राची इंग्रजांनी भारतात साम्राज्यवाद स्थापन करताना व्यापार उद्योग अशा काही अनेक गोष्टीचा साधन म्हणून वापर केला त्याप्रमाणे धर्म देखील त्यांच्या हातातील दुसरे साधन होते. त्यासाठी महात्मा गांधीनी भारतातील जनतेची साम्राज्यवादविरोधी एकजूट तयार व्हावी म्हणून संस्थात्मक धर्म, धार्मिक कर्मकांड आणि धार्मिक रितीरिवाजांना बाजूला ठेवतात आणि सामाजिक, नैतिकता, आध्यात्मिक जाणिवा आणि ईश्वर आणि विश्वाच्या निर्मितीचे ऊर्जा तत्व या संकल्पना धर्माशी जोडतात धर्माला राष्ट्रावादापासून बाजूला काढतात. गांधीनी धर्माला राजकारण आणि राष्ट्रवादाच्या विचारप्रणालीपासून दूर करून प्रादेशिक एक राष्ट्रीयत्वाची कल्पना मांडली.

हिंदू–मुसलमनातील जमातवादी पुढारी आणि स्वार्थी धर्मशिक्षक, शास्त्री, मुल्ला हे धर्माचा चुकीचा अर्थ लावून हिंदू–मुसलमानातील संघर्ष वाढवित आहेत. महात्मा गांधी म्हणतात की अनेक मुसलमान पूर्वीचे हिंदू आहेत. ते धर्मांतरीत झालेले आहेत. त्यामुळे त्यांना वेगळे समजू नये. स्वातंत्र्यपूर्व काळातील द्विराष्ट्रवादाची सिद्धांत त्यांना मान्य नव्हता. ब्रिटीशांच्या कूटनितीमुळे पाकिस्तान राष्ट्र निर्माण झाले. गांधीजी हिंदू राष्ट्रवादाच्या विरूद्ध होते. हा देश सर्वधर्मीयासाठी आहे. 'भारतात हिंदूच राहिले पाहिजेत असे हिंदूना वाटत असले तर त्यांचे मनोराज्य हिंदू–मुसलमान, पारशी व ख्रिश्चन यांनी भारताला आपला देश मानले असून ते सर्व देश बांधव आहेत व त्यांच्या स्वतःच्या हितासाठी सुद्धा त्यांना एकोप्याने राहणे भाग आहे. जगाच्या कोणत्याही भागात एकराष्ट्रीयत्व व एक धर्म हे शब्द समानार्थी नाहीत व भारतातही ते कधीच नव्हते हे गांधीनी आग्रहाने मांडले आहे'[4] राष्ट्रीय ऐक्य निर्माण करण्यातील अडथळे गांधीनां माहित होते ते दूर करण्यासाठी केवळ शासनाच्या प्रयत्नांवर विसंबून राहणे गांधीनां मान्य नव्हते. लोकांच्या सामाजिक शक्ती जागवण्यावर त्यांचा भर होता. सामूहिक अस्तित्वाची भावना मुळापासून बळकट करणे हा त्या कार्यक्रमाचा हेतू होता. अस्पृश्यतेचा विचार त्यांनी राष्ट्रऐक्याच्या दृष्टीने केला होता. शिक्षणाचा मूळ हेतू सुशिक्षित लोकांनी निरक्षरांना समजून घेणे हा आहे. त्यांचा विरोध साम्राज्यशाहीतील मूल्य व्यवस्थेविरूद्ध होता. अशा शक्तीविरूद्ध भारतीयांनी सर्व सामर्थ्य एकवटून उभे राहिले पाहिजे.

गांधीजीच्या हिंदू–मुस्लिम ऐक्यावर टिका केली जाते 'हिंदू–मुस्लिम ऐक्याच्या बाबतीत पुरेसे यश मिळू शकले नाही याचे एक कारण असे सांगितले जाते की आपल्या दक्षिण आफ्रिकेतील अनुभवाच्या आधारे हिंदू–मुस्लिम जमाती समान कार्याच्या प्रेरणेने एकत्रित येतील व सुखाने एक नांदतील अशा स्वप्नात गांधी राहिले'[5] जातीय वैमनस्याची कटुत्वाची सामाजिक–सांस्कृतिक वास्तवाच्या खोलात जाऊन चिकित्सा ते करू शकले नाहीत आणि त्यामुळे धार्मिक व जातीय राष्ट्रवादाचे त्याचप्रमाणे हिंदू व मुस्लिम या दोन्ही जमातींच्या धार्मिक प्रतिगामीपणाचे त्यांना नीट आकलन झाले नाही व ते त्यांच्या मुळावर घाव घालू शकले नाहीत इत्यादी टिका टीकाकारांनी गांधीजीच्यावर केली.

सारांश–

वरील विश्लेषणाचा विचार करता महात्मा गांधीजीचा राष्ट्रवाद हा संपूर्ण मानव जातीच्या व देशाच्या मूलभूत ऐक्यावर भर देणारा होता. जगाशी मैत्री हे त्यांचे ध्येय होते. अमर्याद प्रेम व अन्यायाचा प्रतिकार या दोन्ही गोष्टीचा मिलाफ त्यांना घालवयाचा होता. त्यामुळे प्रखर राष्ट्रवाद त्यांना मान्य नव्हता. पाश्चात्य राष्ट्रवादापेक्षा भारतीय राष्ट्रवादाने वेगळी वाट तयार करावी असा विचार त्यांचा होता. जगातील काही राष्ट्रे संकुचित स्वार्थी राष्ट्रवाद जोपासतात. त्यापेक्षा मानव जातीच्या सेवा व कल्याणाची वाट भारतीय राष्ट्रवादानी

धरावी असे ते विचार मांडतात. कोणत्याही देशाची पिळवणूक करून भारताला स्वातंत्र्य त्यांना नको होते. भारतापासून इतर राष्ट्रांना काही शिकता आले पाहिजे. या देशातील साधन संपत्तीचा उपयोग मानव जातीच्या कल्याणासाठी करता आला पाहिजे. इतर देशांच्या कल्याणाशी अनुरूप ठरेल एवढेच भारताने संपन्न व समृद्ध व्हावे असे ते विचार मांडतात. भारताने सत्य, अहिंसा, सामाजिक ऐक्य व सलोखा या मार्गाने राष्ट्रवाद जोपासावा. अशा प्रकारे संपूर्ण देश ऐक्याचा व मानवकल्याणाचा राष्ट्रवाद गांधीजींनी मांडला आहे.

संदर्भ–

१. फकरूद्दीन बेन्नूर–महात्मा गांधी प्रणीत इतिहासशास्त्र आणि हिंद–स्वराज्य: अन्वयार्थ, प्रकाशक महात्मा गांधी अभ्यास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर पृ.क्र.९२
२. उपरोक्त– पृ.क्र.९७
३. उपरोक्त–पृ.क्र.१०१
४. भोळे भा.ल.–आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे अँण्ड कं.पब्लिशर्स नागपूर पृ.क्र.४८२
५. उपरोक्त–पृ.क्र.४८३

संदर्भ ग्रंथ यादी–

१. बेन्नूर फकरूद्दीन–महात्मा गांधी प्रणीत इतिहासशास्त्र आणि हिंद–स्वराज्य: अन्वयार्थ, प्रकाशक महात्मा गांधी अभ्यास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
२. भोळे भा.ल.– आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे अँण्ड कं.पब्लिशर्स नागपूर
३. जावडेकर आचार्य शं.द.–आधुनिक भारत कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे, १९७९
४. चौसाळकर अशोक–इतिहासाची जमातवादी मांडणी आणि राष्ट्रीय एकात्मता, समाजवादी प्रबोधिनी, इंचलकरंजी, १९९३
५. पळशीकर वसंत–'हिंद स्वराज्य' पुर्नप्रकाशन–दत्ता शिंदे, कोल्हापूर, २००६.